अकोट, जिल्हा अकोला येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय या न्यायालयास दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय अकोट येथून पदे वर्ग करण्यास शासन मान्यता देणेबाबत ....

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीआरसी ११०७/प्र.क्र.२०७/का.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १५ जून, २०१९

संदर्भ-

१. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्रमांक सीआरसी ११०७/प्र.क्र. २०७/का.१२, दिनांक २५ मे, २०१८
२. प्रबंधक (निरीक्षणे-१), मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्रमांक B(W)A/१२२१ of १९८१/२११९/३३१९५, दिनांक १० सप्टेंबर, २०१८

प्रस्तावना -

संदर्भाधीन अ.क्र. (१) येथील शासन निर्णय, विधि व न्याय विभाग दिनांक २५ मे, २०१८ अन्वये अकोट, जिल्हा अकोला येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्यास, तसेच, या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पद निर्माण करण्यास आणि एक अधिक्षक पद पुनरुज्जिवित करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अकोट या न्यायालयासाठी आवश्यक असलेला अन्य कर्मचारीवर्ग हा दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी अकोट, जिल्हा अकोला येथील न्यायालयातून उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधीन अ.क्र. (२) येथील दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर अकोट, जिल्हा अकोला या न्यायालयातून दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अकोट या न्यायालयात कर्मचारी वर्ग करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर केला आहे.

शासन निर्णय-

दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयातून दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अकोट यांचे न्यायालयात खालील पदे वर्ग करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :

अ.क्र.	पदांचे नाव	पदाची संख्या	पदाची वेतनश्रेणी (६ व्या वेतन आयोगानुसार)
१	२	३	४
१	सहायक अधिक्षक	२	९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००
२	लघुलेखक निम्नश्रेणी	१	९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००
३	वरिष्ठ लिपिक	२	५२००-२०२०० + ग्रेड पे २४००

अ.क्र.	पदांचे नाव	पदाची संख्या	पदाची वेतनश्रेणी (६ व्या वेतन आयोगानुसार)
४	कनिष्ठ लिपिक	८	५२००-२०२०० + ग्रेड पे १९००
५	मुख्य बेलिफ	१	५२००-२०२०० + ग्रेड पे २४००
६	बेलिफ	५	५२००-२०२०० + ग्रेड पे १९००
७	शिपाई	२	४४४०-७४४० + ग्रेड पे १३००
८	पहारेकरी	१	४४४०-७४४० + ग्रेड पे १३००
९	सफाईगार	१	४४४०-७४४० + ग्रेड पे १३००
	एकूण	**२३**	

जिल्हा व सत्र न्यायालयांच्या सुधारीत आकृतिबंधामध्ये सदर बदलाची नोंद घेणे आवश्यक राहील.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९४/व्यय-५, दिनांक ०५.०३.२०१९ व अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३५/आपुक, दिनांक २२.०५.२०१९ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१५१५३३१४०९१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagyashree Rajendra Bhaidkar

Digitally signed by Bhagyashree Rajendra Bhaidkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d567849462918ceb7579bb2b56247e927c039bbdf028022a8b9ce837a7c854bb, serialNumber=fb84fefefe4ee219c1bc35b35201c14eab0903e8194a7413a74eed93f32afdb0, cn=Bhagyashree Rajendra Bhaidkar
Date: 2019.06.15 15:22:27 +05'30'

(भाग्यश्री भाईडकर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई,
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
५. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई,
७. सर्व अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सदस्य सचिव, विधि सेवा प्राधिकरण, मुंबई,
९. संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई,

१०.प्रबंधक, उच्च न्यायालय मुंबई, नागपूर, औरंगाबाद व पणजी खंडपीठ,
११.सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालये,
१२.सह संचालक, न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था, उत्तन / नागपूर,
१३.महालेखापाल १, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
१४.महालेखापाल २ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर,
१८. उपजिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर,
१९.वित्त विभाग, व्यय-५ / आ.पु.क., मंत्रालय, मुंबई,३२
२०. विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने
२१. निवडनस्ती (का.१२).